# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.


दिनांक 08/07/2020 (बुधवार)
(सकाळ)

### मोटरसायकल चोरी

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 02 कि.मी अंतरावर वेणा नदीच्या पुलाजवळ येथे दिनांक 30/05/2020 चे 12:00 वा. ते दिनांक 31/05/2020 चे 03:45 वा. दरम्यान फिर्यादी नामे– बाळकृष्ण हिम्मतराव जगताप, वय 57 वर्ष, रा. मोहगाव ता.जि नागपुर हे त्यांच्या एमएच–27/बीआर–2610 क्रमांकाच्या मोटरसायकलने कंपनीपुन घरी जात होते. दरम्यान वेणा नदीचे पुलाजवळ फिर्यादीच्या गाडीचा टायर फुटुन अपघात झाल्याने मुलाला दवाखान्यात नेले असता घटनास्थळावरून अज्ञात आरोपीने फिर्यादींची किंमती 30,000/– रू मोटरसायकल चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ खंडारे 9923155153 हे करीत आहे.

### गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 0.5 कि.मी अंतरावर मौजा नांदोरा येथे दिनांक 07/07/2020 चे 15.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. पुजा रेनिश वडसरीया, वय 24 वर्ष, रा. रामवाडी जिवनज्योत हॉस्पीटल आयलॅड पार्क, सोसायटीनगर रोड पुणे, ह.मु जठरवाडा, ता. कारंजा जि. वर्धा या त्यांचे आजी नामे– ग.भा. पुष्पलता पुंडलिकराव बागडे व पतीसह त्यांचे घराचा नमुना 8 आणण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालय नांदोरा येथे गेले होते. दरम्यान आरोपी क्र. 1) देवकांत पुंडलिकराव बागडे, 2) सौ. शिल्पा देवकांत बागडे, 3) रोशन धनराज तागडे, 4) सौ. स्नेहलता छबीराम सोमकुवर व 5) राकेश छबीराम सोमकुवर, सर्व रा. नांदोरा यांनी गैरकायदयाची मंडळी गोळा करून फिर्यादीला म्हटले की, 'तुम्ही घराचा कोणताच डाकुमेंट घेवु नका' असे बोलुन फिर्यादी यांचे सोबत भांडण करून हातबुक्कीने मारहाण केली. तसेच फिर्यादींचे पती भांडण सोडविण्यासाठी मध्यस्ती गेले असता आरोपीतांनी त्यांना हातबुक्कीने मारहाण केली त्यामुळे त्यांचे डावे डोळयाचे वर मार लागला तसेच फिर्यादीची आजी हिला आरोपी क्र. 1 याने गालावर थापडा मारल्या व शिवीगाळ करून भांडण केले व जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीतांविरुध्द कलम 143,147,323,504,506 भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सूरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ दिलीप इंगळे 9011119522 हे करीत आहे.

## जबर दुखापत

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 08 कि. मी अंतरावर मौजा साजगाव नंदु वाघमारे यांच्या घराजवळ येथे दिनांक 06/07/2020 चे 18:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– योगेश वामणराव सातपुते, वय 35 वर्ष, रा. प्रभाग क्र. 2 बोरी व आरोपी 1) नंदु वाघमारे 2) अतुल लालसरे, दोन्ही रा. सातगाव यांच्या मध्ये जुना वाद होता. फिर्यादी हे त्यांच्या एमएच–40/एएम–7779 क्रमांकाच्या मोटरसायकलने त्यांचा मित्र नामे– अक्षय रायपुरे यांच्या सोबत फिर्यादी यांच्या ऑफीस मध्ये जात असता आरोपीतांनी फिर्यादीला थांबवुन काही कारण नसतांना आरोपीने त्याच्या खिशातुन चाकु काढून फिर्यादीच्या उजव्या पायाच्या टोंगळयावर चाकु खुपसुन गंभीर जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 326, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री लगड 9923796904 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर